सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -३६२५/ प्र. क्र. ३३/ पोल-३, दि. २७/०३/२०२६

**विषय**:- ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठदाराचे देयक अदा करणेबाबत व Mobilization advance देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -३६२५/ प्र. क्र.३३/ पोल-३, दि. २७/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२७१९४०४३२७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 02-04-2026 11:03:21

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादाराचे देयक अदा करणेबाबत व Mobilization advance देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३६२५/प्र.क्र.३३/पोल-३**
गृह विभाग,२ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०२६.

**वाचा :-**

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयएसएस १००९/प्र.क्र.३१३/विशा-४, दि. २७.७.२०११.
२) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती (H.P.C.) च्या दि.५.७.२०२३, दि. ९.१०.२०२३, दि.६.३.२०२४, दि.२७.५.२०२४, व दि.३०.९.२०२४ रोजीच्या बैठकांचे इतिवृत्त.
३) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी समिती (P.I.C.) च्या दि.१.८.२०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.१.२०२४. दि.९.४.२०२५.
५) गृह विभाग, शासन पूरकपत्र क्र. सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.७.२०२४.
६) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/ ठाणे शहर CCTV प्रकल्प/ २८/२०२१ दि. २.१०.२०२४ चे MSA बाबतचे पत्र.
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.७.४.२०२५.
८) गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ३६२५/प्र.क्र.३३/पोल-३, दि. २९.४.२०२५, दि.२२.०७.२०२५, दि. २६.०८.२०२५, दि.१०.१२.२०२५ व दि.३१.०१.२०२६.
९) System Integrator मे. M/s. Siddharth Infratech & Services Pvt. Ltd. Hyderabad यांचे देयक दि.११.१२.२०२५, दि. ०३.०२.२०२६ व दि. २४.०२.२०२६.
१०) पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पत्र क्र. CP THN/CCTV/SI Bill/57/२०२६, दि. ०८.०१.२०२६.
११) पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पत्र क्र. CP THN/CCTV/SI Bill/278/२०२६, दि. ०५.०२.२०२६.
१२) पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पत्र क्र. CP THN/CCTV/SI Bill/366/२०२६, दि. ०२.०३.२०२६.
१३) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/ ठाणे शहर CCTV प्रकल्प/ २८/२०२१-२०२६, दि. ०५.०३.२०२६ व दि. ११.०३.२०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील शहरांमध्ये नागरिकीकरण व औद्योगिकीकरण यामुळे लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, यांचा विचार करुन “सुरक्षित शहर” ही संकल्पना राबविताना सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यासाठी प्राधान्यक्रम ३ वर ठाणे शहराचा समावेश आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाने अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये सादर केलेल्या ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेराच्या रु.४९२,८९,४१,१६७/- (अक्षरी रुपये चारशे ब्याण्णव कोटी एकोणनव्वद लाख एकेचाळीस हजार

एकशे सदुसष्ट फक्त) एवढ्या रक्कमेच्या प्रकल्प अहवालास दि. ०५ जानेवारी,२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दि.३०.९.२०२४ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

२. दि.९.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे "ठाणे पोलीस आयुक्तालयाने अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ३०.९.२०२४ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये सादर केलेल्या ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेराच्या रु.५७५,८७,८१,३६२/-(अक्षरी रुपये पाचशे पंच्याहत्तर कोटी सत्त्याऐंशी लाख एक्याऐंशी हजार तीनशे बासष्ट फक्त) (जीएसटीसह) एवढ्या रक्कमेच्या प्रकल्प अहवालास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

३. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाअंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे उभारणी करीता M/s. Siddharth Infratech & Services (I) Pvt.ltd. Hyderabad यांना System Integrator or Lead Bidder म्हणून दि.०३/१०/२०२४ रोजी सेवा पुरवठा आदेश दिलेले आहेत. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन क्र. ८ येथील शासन निर्णयांन्वये काही देयके अदा करण्यास मान्यता देऊन निधी वितरित करण्यात आला आहे.

४. पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या कार्यक्षेत्रातील ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पांतर्गत प्रकल्प कंत्राटदार/पुरवठादार मे. सिध्दार्थ इन्फ्राटेक अँड सर्व्हीसेस प्रा.लि. हैद्राबाद यांची देयके अदा करण्यासंदर्भात अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन क्र. १३ येथील पत्रांन्वये पुढीलप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर केले आहेत :-

१) **Milestone-10** SITC of the following Components:1. Cameras - 30% of the Total Quantity & 2. Viewing Centres - 20% of the total quantity याबाबतच्या कामासंदर्भातील रोखून ठेवलेली रू. ५,५४,७५,६३३/- इतकी रक्कम अदा करण्याबाबतचा प्रस्ताव दि. ०५.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

२) ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भातील Milestone-6 व 7 आणि Milestone-8 व 9 च्या देयकामधून दंडनीय शुल्क म्हणून रोखून ठेवलेल्या एकूण रू. १,०७,२५,२८९/- इतक्या रकमेतून दंडनीय शुल्काची रक्कम वगळून उर्वरित रक्कम रू. ७५,२०,०००/- इतकी रक्कम अदा करण्याबाबतचा प्रस्ताव दि. ०५.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

३) उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. ०६.११.२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार Milestone-2 च्या संदर्भात Advance Bank Guarantee च्या बदल्यात Mobilization advance म्हणून पुरवठादार यांनी सादर केलेले रू. १३,३०,००,०००/- इतक्या रक्कमेचे देयक अदा करण्याबाबतचा प्रस्ताव दि. ११.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त प्रस्तावांच्या अनुषंगाने तसेच, ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. ०६.११.२०२६ व दि. २३.०१.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ठाणे

सीसीटीव्ही प्रकल्पाचे पुरवठादार/कंत्राटदार M/s Sri Siddharth Infratech & Service PVT. Ltd. Hyderabad यांना Milestone-10 च्या कामासंदर्भातील रोखून ठेवलेली रक्कम रू. ५,५४,७५,६३३/-, Milestone-६ व ७ आणि Milestone-८ व ९ च्या देयकामधून दंडनीय शुल्क म्हणून रोखून ठेवलेल्या रकमेतून दंडनीय शुल्काची रक्कम वगळून उर्वरित रक्कम रू. ७५,२०,०००/- आणि रू. Milestone-2 च्या संदर्भात Advance Bank Guarantee च्या बदल्यात Mobilization advance म्हणून पुरवठादार यांना रू. १३,३०,००,०००/- अशी **एकूण रू.१९,५९,९५,६३३/-** इतकी रक्कम अदा करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पातंर्गत Milestone-१० मधील कामे पुर्ण केल्यानंतर रू.५१,७७,७२,५७८/- इतक्या रकमेचे देयक देय आहे. तथापि, काही कारणामुळे (बाह्य अवलंबितामुळे) सदर कामे पुर्ण करण्यास विलंब झाल्यामुळे या रकमेतून रू. ५,५४,७५,६३३/- इतकी रक्कम राखून ठेवून उर्वरित रू. ४६,२२,९६,९४४/- इतकी रक्कम दि. ३०.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आली आहे. Milestone-१० मधील कामाकरिता Urban Local Bodies, MMRDA, MIDC यासारख्या स्थानिक प्राधिकरणांकडून परवानग्या देण्याकरिता झालेला विलंब, ट्रेचिंगमध्ये झालेला बदल, स्थानिक घटकांकडून आलेले अडथळे, वातावरण व पायाभूत सुविधा आणि रस्ते विस्तारीकरणामुळे ठिकाणांमध्ये झालेला बदल इ. घटकांमुळे विलंब झाला असल्यामुळे ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. २३.०१.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार रोखून ठेवलेली रू. ५,५४,७५,६३३/- इतकी रक्कम M/s Sri Siddharth Infratech & Service PVT. Ltd. Hyderabad यांना अदा करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. ०६.११.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात Milestone-6 व 7 आणि Milestone-8 व 9 च्या देयकामधून दंडनीय शुल्क म्हणून रोखून ठेवलेल्या एकूण रू. १,०७,२५,२८९/- इतक्या रकमेतून दंडनीय शुल्काची रक्कम वगळून उर्वरित रक्कम रू. ७५,२०,०००/- इतकी रक्कम M/s Sri Siddharth Infratech & Service PVT. Ltd. Hyderabad यांना अदा करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३. ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाचे System Integrator/कंत्राटदार/पुरवठादार M/s Sri Siddharth Infratech & Service PVT. Ltd. Hyderabad यांना Milestone-2 च्या संदर्भात Advance Bank Guarantee च्या बदल्यात Mobilization advance म्हणून रू. १३,३०,००,०००/- इतकी रक्कम अदा करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त परि. १ ते ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे **एकूण रू.१९,५९,९५,६३३/- (रूपये एकोणीस कोटी एकोणसाठ लाख पंच्याण्णव हजार सहाशे तेहतीस फक्त) इतकी रक्कम ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाचे System Integrator/कंत्राटदार/पुरवठादार M/s Sri Siddharth Infratech & Service PVT. Ltd. Hyderabad यांना अदा करण्यास मंजुरी देऊन त्याकरिता निधी वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.**

५. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा “मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२ यंत्रसामुग्री साधनसामुग्री” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२६ वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

६. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दि.५.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली असून सदर प्रकल्पांचा निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त,ठाणे यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून तसेच त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-दोन, मधील अ.क्र.२७ (अ) नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार, तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग दि.०७/०४/२०२५ व दि. ०५/०१/२०२६ अनुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२१५/२०२६/व्यय-७ दि.१७.०३.२०२६ अन्वये सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२७१९४०४३२७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148cc aa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6C DFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.27 19:41:59 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ / २ , मुंबई/नागपूर.
१२. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
१३. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
१४. आयुक्त, भिवंडी निझामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे.

१५. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर जि. ठाणे.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१८. सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग (व्यय-७ / वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई.
१९. उपसचिव (अर्थसंकल्प शाखा) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ, जि. ठाणे.
२१. मुख्याधिकारी, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद, अंबरनाथ, जि. ठाणे.
२२. निवडनस्ती पोल-३.